**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : १३७/२०२०**

**अपिलार्थी, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,**
**रा. रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ.**
**विरुध्द**
**उत्तरार्थी १. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
बांधकाम विभाग, नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.

सुनावणी दिनांक १३.०८.२०२६ (In Continuation of order dated १०.०२.२०२६)

द्वितीय अपील सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. हरिश जाधव, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय देशपांडे व विद्यामान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. व्हि.पी.आजनकर उपस्थित आहेत.

**विवेचन**

प्रस्तुत प्रकरणी आयोगाने दि. १०.०२.२०२६ रोजी सुनावणी घेवून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय देशपांडे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांचेविरुध्द रु. २५,०००/- शास्ती का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०२.२०२६ रोजी माहितीचे प्रदान केले.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगास सादर केला त्यानुसार दि. ०४.०९.२०२५ रोजी पारित आदेशाची प्रत दि. ०६.०२.२०२६ रोजी प्राप्त झाली त्यामुळे पारित आदेशाबाबत ज्ञात नसल्याने विहित कालावधीत माहिती पुरविणे शक्य झाले नाही. मात्र श्री. गवई त्यांच्या लेखी निवेदनात मान्य करतात की, दि. ०४.०९.२०२५ च्या सुनावणीला अपिलार्थीला माहिती पुरविण्याबाबत मौखिक आदेश आयोगाने दिलेले होते, मात्र अपिलार्थी कार्यालयात न आल्याने त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही. श्री. अमर गवई हे दि.२६.०७.२०२५ पासून जन माहिती अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीला माहिती आयोगाने निर्देश दिल्यानंतरच देणे अधिनियमानूसर अभिप्रेत नाही. त्यांनी देखील प्रदिर्घ कालावधीकरिता अपिलार्थीचा माहिती मागणीचा अर्ज प्रलंबित ठेवला.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय देशपांडे सांगतात की, त्यांना आदेशाची प्रत मिळालेली नाही. त्यामुळे खुलासा आणलेला नाही. श्री. देशपांडे यांना आदेशाची प्रत देण्याबाबत श्री. जाधव यांना निर्देश दिले.

अपिलकर्ता यांनी इमारत बांधकाम परवानगीतील कथित अनियमिततेबाबत नगर परिषद यवतमाळचे सन २०१७-१८ चे लेखापरिक्षण अहवालाची प्रत सादर केली. त्यानुसार "*इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर भोगवटदाराने काम पुर्ण झाल्याबाबत नगर परीषदेला कळविले पाहिजे तदनंतर मुख्यअधिका-याने पाहणी करुन इमारत वापरण्याची परवानगी दिली पाहिजे व सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याबाबत कर विभागास कळविले पाहिजे व कर विभागाने इमारतीचे पाहणी करुन मालमत्ता कराची आकारणी केली पाहिजे परंतु याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने मालमत्ता कराचे नुकसान होत असून दर चार वर्षाने होणा-या कर आकारणीच्या वेळी अश्या मागील ३-४ वर्षात पूर्ण झालेल्या इमारती वर कर आकारणी करण्यात येते त्यामुळे अश्या इमारतीवर मागील ३-४ वर्षात भेटणारा मालमत्ता कर नगर परीषदेला मिळत नाही. याकरीता सर्वस्व जवाबदारी संबंधित नगर रचनाकार विभाग/बांधकाम विभाग, कर विभाग व मुख्याधिका-याची असुन याप्रमाणे कार्यवाही करत नसल्याने मोठ्या प्रमाणात नगर परीषदेचे नुकसान होत आहे, तरी याबाबत योग्य कार्यवाही होणे आवश्यक आहे.*" असे नमूद आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात यावे, अशी विनंती अपिलकर्ता यांनी केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येते.

वरील बाब लक्षात घेता, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

**अंतरिम आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय देशपांडे यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये दि. ०४.०९.२०२५ व दि.१०.०२.२०२६ रोजीच्या पारित आदेशानूसार प्रस्तावित शास्ती कायम का करण्यात येवू नये, याबाबतचा खुलासा त्यांनी पुढील सुनावणीचे वेळी व्यक्तीश: उपस्थित राहुन सादर करावा. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन एकतर्फी निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांचेविरुध्द दि. १०.०२.२०२६ रोजीच्या पारित आदेशानूसार कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये प्रस्तावित असलेली शास्ती कायम करण्यात येत असून रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतक्या शास्तीची कार्यवाही करण्यात येते.

३. आंहरण व संवितरण अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यतवमाळ यांनी जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांचे वेतनातून उपरोक्त शास्तीची रक्कम एकसमान दोन टप्प्यात वसूल करुन ती रक्कम माहिती अधिकार अधिनियमाचे लेखाशिर्ष ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) मध्ये जमा करावी. तसेच वसूल केलेल्या चलानची प्रत अनुपालन म्हणुन आयोगास प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावी.

४. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कार्यालयीन प्रक्रियेतून तयार होऊन, अवबंधीत नसल्यामुळे देय्य ठरत असताना जन माहिती अधिकाऱ्याने प्रदान केली नाही. परिणामी त्यांना प्रथम अपिल अर्ज व व्दितीय अपील अर्ज दाखल करून माहितीची प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे त्यांना आर्थिक व शारिरीक झळ सोसावी लागली. म्हणून प्राधिकरणाने कलम १९(८)(ख) चे तरतुदीनुसार अपिलार्थीस रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये विस हजार फक्त) ची नुकसान भरपाई



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग अमरावती विभाग

का देण्यात येवू नये, याबाबतचा खूलासा विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करावा.

५. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (क), १८ (२) व २५ (५) नूसार आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी झालेल्या कथीत भ्रष्टाचाराबाबत पुनश्च फेरचौकशी करावी व तपासणीत आढळून आलेल्या दोषी अधिकारी/कर्मचारी विरुध्द जोडपत्र १ ते ४ ची बजावणी करुन विभागीय चौकशी प्रस्तावित करावी व तसा अहवाल २ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

६. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या आदेशाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय देशपांडे यांना प्रदान करुन त्यांना पुढील सुनावणीचे वेळी व्यक्तीश: उपस्थित राहुन खुलासा सादर करण्याबाबत सूचना द्याव्या व तसा अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करावा.

७. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २१.०८.२०२१ रोजी घेण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १३.०८.२०२६**

जावक क्रमांक ६३०६ दिनांक 19 AUG 2026

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती